# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक

**विषय: विद्यार्थी सुरक्षा विमा, विद्यार्थी कल्याण निधी, विद्यार्थी आरोग्य सेवा योजना, आपत्कालिन निधी, विद्यापीठ क्रीडा मंडळ व शारीरिक शिक्षण मंडळ निधी, नोंदणी शुल्क, संगणक शुल्क व विकास निधीतील विद्यापीठ हिस्सा ऑनलाईन पध्दतीने पाठविण्याच्या मुदतवाढीबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मध्ये आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा ऑनलाईन पध्दतीने चलनाद्वारे दि. ३१ डिसेंबर, २०२२ पर्यत भरण्याबाबत विद्यापीठ परिपत्रक क्र. ४७४/२०२२ दि. १५/१२/२०२२ अन्वये कळविले होते. त्यानंतर शै. प्रवेश/६३३७,दि. ०२/०१/२०२३ नुसार ३०/०१/२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती तसेच शै. प्रवेश/८३९, दि. ०७/०२/२०२३ नुसार १७/०२/२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तथापी, काही महाविद्यालय/संस्था यांनी शुल्काची रक्कम अद्यापही भरलेली नाही.

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना पुन:श्च कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालय/संस्थानी अद्यापही विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा ऑनलाईन पध्दतीने चलनाद्वारे भरला नसेल त्यांना **दि. ३१ मार्च, २०२३** पर्यंत भरण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे. ऑनलाईन प्रो–रेटा व इतर निधी संबंधी माहिती भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया BOD पोर्टल अंतर्गत दिली आहे. BOD login मध्ये 'प्रो–रेटा ऑनलाईन' हि लिंक वापरून सदरची माहिती भरण्यात यावी.

यापुढे याकरीता कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**उपकुलसचिव**
**शैक्षणिक प्रवेश**

गणेशखिंड, पुणे – ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/ ११४६
दिनांक : ०३/०३/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये.
मा. संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असेलेल्या सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था.
प्रत :
मा. वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. संचालक, विद्यार्थी विकास, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. संचालक, क्रिडा व शारिरीक शिक्षण, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

E:\Pro-Rata Circular 2022-23

Scanned by CamScanner